# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई **दिनांक ०२.११.२०२१**

**आंतरराज्यीय कार वाहन चोरी करणारी सराईत गुन्हेगारांच्या टोळीतील एकुण ०७ आरोपीनां मुंबई, सुरत, आसनसोल, कोलकाता येथून नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष-१ कडून अटक एकुण १८ महागडया मोटार कार (त्यामध्ये मारूती स्वीप्ट डिजायर - ०८, मारूती सुझुकी इरटिगा -०३, मारूती सुझुकी सियाज - ०२, मारूती सुझुकी स्विप्ट - ०२, महिंद्रा स्कॉर्पिओ - ०१, हुडांई आय२० - ०१, मारूती रिटझ कार -०१) व इतर साहित्य असा एकुण १,४६,५०,०००/- रु.(एक करोड शेचाळीस लाख पन्नास हजार रूपये) कि. चा मुद्देमाल हस्तगत व नवी मुंबई पोलीस आयुक्तालय -११, ठाणे पोलीस आयुक्तालय - ०२,मिरा-भाईंदर आयुक्तालय-०२, मुंबई शहर- ०१, पिंपरी चिंचवड- ०१, गाझीयाबाद- ०१, दिल्ली-०२ असे एकुण २० मोटार कार चोरीचे गुन्हयांची उकल**

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात मोटार कार चोरी करण्या-या टोळींनी धुमाकुळ घातला होता. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये मोटार कार चोरी होण्याचे सत्र चालुच होते. त्यामुळे मा. पोलीस आयुक्त श्री. बिपिन कुमार सिंह, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. डॉ. जय जाधव व अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. महेश घुर्ये यांनी गुन्हे शाखेतील अधिकारी व अमंलदार यांना विशेष मोहीम राबवुन मोटार कार चोरी करणा-या गुन्हेगारी टोळीच्या मुसक्या आवळुन वेळीच प्रतिबंध करण्याबाबत आदेश दिले होते.

त्या अनुषगांने मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. सुरेश मेंगडे, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा ,कक्ष-१ ची दोन तपास पथके १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल शिंदे, पोना/ शशीकांत जगदाळे, पोशि/ जालींदर गायकर २) सहा. पोलीस निरीक्षक, हर्षल कदम, पोना/निलेश किंद्रे, पोना/भांगरे व पोशि/संतोष मिसाळ अशी तयार केली. नमूद तपास पथकाने मार्च २०२१ ते जून २०२१ या कालावधीत घडलेल्या मोटार कार चोरी गुन्हयाचे खारघर, रबाळे, नेरूळ, एन.आर.आय., खांदेश्वर, सानपाडा, कल्याण, मिरा- भाईंदर या हददीतील घटनास्थळास भेटी देवून, सीसीटीव्ही फुटेज पाहून व तांत्रिक तपास करून सानपाडा पो. ठाणे गु.र.नं. ८८/२०२१ भादवि कलम ३७९, ४२७ या गुन्हयात दिनांक ०९/०७/२०२१ रोजी गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी मोहम्मद तौफिक हबीबुल्ला व त्याचा साथीदार मनोज गुप्ता यास अटक केली होती तेव्हा अटक आरोपी यांचेकडे कसोशीने तपास करून **त्यांचेकडून एकुण १२ मोटार वाहन कार चोरीचे गुन्हे उघडकीस आणून एकुण ६४,५०,०००/-रू कि. च्या एकुण ०७ मोटार कार हस्तगत केल्या होत्या. तपासामध्ये अटक आरोपी यांनी कट रचून चोरी केलेल्या** कारचे मुळ इंजिन नंबर/चेसीस नंबर डॅमेज करून त्यावर अपघातामध्ये पूर्णपणे नुकसान झालेल्या मोटार कारचे इंजिन/चेसिस नंबर स्क्रॅप डिलर यांचेकडुन प्राप्त करून सदरचे नंबर चोरलेल्या मोटार कारच्या इंजिन/चेसिस नंबरवर प्रिंट करून बनावटीकरण

केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने गुन्हयांचे कलमामध्ये भादवि कलम ४२०, ४६५, ४६६, ४६८, ४७१, ४७३, ४७४, ४११,४१३,४१९,४२०, १२०(ब), ३४ अशी वाढ केली.

**गुन्हयांमध्ये आंतरराज्यीय कार चोरी करणारी गुन्हेगारांची टोळी सक्रिय असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने व गुन्हयांची व्याप्ती मोठी असल्याने तसेच गुन्हंयातील चोरीस गेलेल्या कार या** गुजरात येथील सुरत, प.बंगाल येथील कोलकाता, मुर्शिदाबाद, असनसोल तसेच झारखंड राज्य अशा ठिकाणी विकल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हे शाखा, कक्ष-१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक, हर्षल कदम, पोलीस हवा./ रोहीदास पाटील, पोलीस हवा. /बालाजी चव्हाण, पोना/ शशीकांत जगदाळे, पोना/निलेश किंद्रे, पोना/२०४९ मोरे, पोना/भांगरे असे तपास पथक मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. सुरेश मेंगडे, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली वर नमूद ठिकाणी जावून तांत्रिक तपास करून गुन्हयातील पाहीजे आरोपीतांचा शोध घेत असताना माणीकपूर पोलीस ठाणे, मिरा- भाईंदर गु.र.नं. २४२/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयाचे तपासकामी माणीकपूर पो. ठाणे येथील तपास पथक सपोनि. सचिन सानप, पोउपनि. तुकाराम भोपळे, पोहवा/ शैलेश पाटील, पोना/ शामेश चंदनशिवे व पो.कॉ./ किरण आव्हाड हे देखील कोलकाता येथे असल्याने त्यांची प.बंगाल राज्यातील आरोपींना अटकेकामी व ०२ कार जप्त करणेकामी मदत घेवून नमूद गुन्हयात आणखी ०५ आरोपींना अटक केली. अटक आरोपींकडे गुन्हयांचे अनुषंगाने सखोल तपास करून **एकुण ८२,००,०००/-रू कि. च्या ११** मोटार कार (**मारूती स्वीप्ट डिजायर - ०६, इरटिगा - ०२, मारूती सुझुकी सियाज - ०१, महिंद्रा स्कॉर्पिओ - ०१, मारूती रिटझ- ०१**)हस्तगत केल्या असता सर्व वाहनांचे इजिंन नंबर व चेसिस नंबर यामध्ये खाडाखोड करून बनावट कागदपत्रे तयार करून सदरची वाहन विक्री केल्याचे निष्पन्न करून **०८ मोटार वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असून** हस्तगत केलेल्या ०३ मोटार कार यांचे इंजिन नंबर व चेसीस नंबर यामध्ये खाडाखोड केली असल्याने त्यांचे मूळ क्रमांक मिळून न आल्याने सदर कारबाबत अधिक तपास चालू आहे.

**सुरत, मुंबई, कोलकाता, असनसोल येथून अटक केलेले आरोपी-**

१) मनिष देवसिभाई चोवटीया, वय ४७ वर्षे, रा. प्लॅट नं. ए ५०२, संकल्प कॉर्नर, श्यामधाम मंदिराजवळ, सलठाणा जकात नाका, वराछा रोड, सुरत, राज्य - गुजरात

२) जमाल्लुददीन मम्मुददीन सहा, वय ४५ वर्षे, रा. रूम नं. ०२, इस्लाम चाळ, गुरूद्वारा जवळ, नारायण नगर हिल नं. २, होमगार्ड जवळ, घाटकोपर (पश्चिम), मुंबई

३) नौशाद इरशाद अन्सारी उर्फ पाठक वय ४४ वर्षे धंदा- गॅरेज काम रा. ६/१८, राणा प्रताप रोड, लाल मैदानाजवळ, दुर्गापूर प.बगांल

४)मो. राशीद मोहम्मद अली वय ३५ वर्षे धंदा- गॅरेज काम रा. ४/सी, नॉर्थ रेंज, रॉयल गार्डन हॉटेलच्या मागे, बनियापुकुर कोलकाता-१७ प.बंगाल

५) सुमित महेश जालान वय ४० वर्षे धंदा- गॅरेज मॅकेनिक रा. १८/बी, टॉवर २, आकांता सोसा. ऍक्शन एरिया २/सी न्यू टाउन, बाजारहाट, कोलकाता प.बंगाल

**यापूर्वीअटक केलेले आरोपी-**

१) मोहम्मद तौफिक हबीबुल्ला वय ४० वर्षे सध्या रा. रूम नं. २०१, गंगासागर सोसा. सेक्टर २३ उलवे नवी मुंबई

मूळ रा. नरसिंगपूर पो. शितलागंज, थाना- कंधाई तहसील पटटी, जि. प्रतापगढ राज्य- उत्तरप्रदेश

२) मनोज राजेंद्र गुप्ता वय ३४ वर्षे रा. रूम नं. सी/००१, यमुना बिल्डींग, लोढा हेवन, निळजे गाव, डोंबिवली

ईस्ट, ठाणे मूळ रा. ग्राम बरहजपार, पो. चिलवा थाना- गोलाबाजार, जि. गोरखपूर उत्तरप्रदेश

**आरोपी यांची गुन्हा करण्याची पध्दत:-**

सदर गुन्हयाचे तपासात अटक आरोपीत मोहम्मद तौफिक हबीबुल्ला हा सराईत मोटार कार चोर असून मुख्य आरोपी आहे.

मुख्य आरोपी हा त्याच्या वेगवेगळया साथीदारांसह समान उद्‌देश ठेवुन व कट रचुन पार्क केलेल्या कारच्या दरवाज्याची काच तोडुन नुकसान व आगळीक करून कारचा दरवाजा उघडतो. त्यानंतर कारचे टुल बॉक्स उघडुन डी.सी.एम. सॉकेट डिसकनेक्ट करतो. त्यानंतर कारचे बोनेट उघडुन सायरन नोड डिसकनेक्ट करतो व पुन्हा कारमध्ये जावुन ओ.सी.एम. सॉकेट बनवितो. त्यानंतर पुन्हा कारचे खाली उतरून एक्सटर्नल वायरने बॅटरी ते फ्युज बॉक्स जोडतो. त्यानंतर आधुनिक पध्दतीचा टॅब वापरून त्यास वायफाय कनेक्ट करून वाहनांच्या स्वीच ऑन/ऑफ (इग्निशन) बटणावर ठेवून मोटार कारचे इंजिन कंट्रोल मॉडयुल युनिट(ECM ) मध्ये असणारे मोटार कार चावीचे कोड आधुनिक पदधतीच्या टॅबने स्कॅन करून डिकोड करतो व मोटार वाहनाची डुप्लीकेट(बनावट) चावी बनवून कार चोरी करतो.

चोरी केलेल्या कारच्या सहाय्याने मुख्य आरोपी व त्याचे साथीदार हे इतरही कार चोरी करीत असतात. चोरलेल्या कार हया सुरत व कोलकाता येथे विक्रीसाठी आरोपी मनिष चवोटीया, नौशाद अन्सारी, मो. राशीद मोहम्मद अली यांचेकडे पोहोच केल्या जातात.

अटक आरोपी व पाहिजे आरोपीत हे कारचे मुळ इंजिन नंबर/चेसिस नंबर डॅमेज करून त्यावर अपघातात स्क्रॅप झालेल्या मोटार कारचे इंजिन/ चेसिस नंबर स्क्रॅप डिलर यांचेकडुन प्राप्त करून सदरचे नंबर चोरलेल्या मोटार कारच्या इंजिन/ चेसिस नंबरवर प्रिंट करून बनावटीकरण करतात व सदरचे नंबर हे बनावट आहेत हे माहिती असून देखील बनावट इंजिन /चेसीस नंबर वाहन प्रणालीवर शोधून रजिस्ट्रेशन क्रमांक प्राप्त करून बनावट नंबर प्लेट तयार करून, चोरीची कार ही सेकंडहॅन्ड विक्रीसाठी आहे असे भासवून सर्वसामान्य ग्राहकांना विकतात व चोरीची कार विक्री करून त्यातून स्वत: करीता गैरमार्गाने पैस मिळवीत असतात.

अटक आरोपी यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी-

१) मो. तौफिक हबीबुल्ला -२७ गुन्हे

२)मनिष देवसीभाई चोवटीया- ४४ गुन्हे

३) मनोज राजेंद्र गुप्ता - ०३ गुन्हे

**नमूद तपास पथकाने अथक परिश्रम करून अटक आरोपी यांचेकडून एकुण १८ कार हस्तगत केल्या असून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

१)सानपाडा पो. ठाणे गु.र.क्र. ८८/२०२१ भा.द.वि. कलम ३७९,४२७
२)खारघर पोलीस ठाणे, गु.र.नं. २१०/२०२१, भादंविसं कलम ३७९
३)रबाळे पोलीस ठाणे, गु.र.नं.११४/२०२१, भादंविसं कलम ३७९
४)रबाळे पोलीस ठाणे गु.र.नं.३४३/२०२० भादंविसं कलम ३७९
५) माणिकपूर पो. ठाणे गु.र.क्र. २४२/२०२१ भादवि कलम ३७९
६)शाहीबाबाद पो.ठाणे गाजियाबादगु.र.नं.१९१०/२०२१,भादंविक ३७९
७)फर्शबाजार पो. ठाणे, दिल्ली गु.र.नं.३५२५/२०२०, भादंविक ३७९
८) ई-पो. ठाणे किर्तीनगर, दिल्ली गु.र.नं. २४७८०/२१ भादंविक ३७९

**यापूर्वी उघडकीस आणलेले गुन्हे -**

१)खांदेश्वर पो. ठाणे गु.र.क्रं. १४६/२०२१, भादंविसं कलम ३७९
२)कामोठे पोलीस ठाणे गु.र.नं. ११५/२०२०, भादविसंक ३७९
३) सिबीडी पो. ठाणे गु.र.नं. ४५/२०२१ भादवि कलम ३७९
४)एनआरआय पो. ठाणे गु.र.नं. ७०/२०२१ भादवि कलम ३७९
५)खारघर पो. ठाणे गु.र.नं. ४०२/२०१९ भादवि कलम ३७९
६)खारघर पो. ठाणे गु.र.नं. ४०६/२०१९ भादवि कलम ३७९
७)रबाळे पो. ठाणे गु.र.नं. २२०/२०२० भादवि कलम ३७९
८) चितळसर पो. ठाणे, गु.र.क्रं. १३४/२०२१, भादंविसं कलम ३७९
९)खडकपाडा पो.ठाणे, कल्याण गु.र.क्रं.१९७/२०२१, भादंविसं कलम ३७९
१०)माणिकपूर पो. ठाणे, वसई गु.र.क्रं. २४०/२०२१, भादंविसं कलम ३७९
११)बोरीवली पो. ठाणे, मुंबई, गु.र.क्रं. ८६७/२०२१, भादंविसं कलम ३७९
१२)पिंपरी चिंचवड पो. ठाणे गु.र.क्रं. ४०९/२०२१, भादंविसं कलम ३७९

**तसेच मुख्य आरोपी मो. तौफिक हबीबुल्ला हा खालील गुन्हयात पाहीजे आरोपी असल्याचे निष्पन्न केले.**

१.एनआरआय पो. ठाणे गु.र.नं. ३६९/२०१९ भादवि कलम ३७९
२. रबाळे पो. ठाणे गु.र.नं. २३३/२०१९ भादवि कलम ३७९
३. नेरूळ पो. ठाणे गु.र.नं. ४७२/२०१९ भादवि कलम ३७९
४.रामनगर पो. ठाणे डोंबिवली गु.र.नं. ३५६/२०१९ भादवि कलम ३७९
५.अर्नाळा पो. ठाणे गु.र.नं. ०४/२०२० भादवि कलम ३७९
६.भिवंडी शहर पो. ठाणे गु.र.नं. २५०/२०१९ भादवि कलम ३७९
७. बदलापूर्व पो. ठाणे गु.र.नं. १०२/२०१९ भादवि कलम ३७९
८. किशनगंज पो. ठाणे इंदौर गु.र.नं. १०८/२०२० भादवि. ३५३, ३३२
३०७, १७७, ३२३, १२०ब, ४२०,४६७ ४६८, ४७१, ३४
९. भवंरकुआ पो. ठाणे इंदौर गु.र.नं. ११३/२०२० भादविसंक ३७९

१०. चंदननगर पो. ठाणे इंदौर गु.र.नं. १२१/२०२० भादविसंक ३७९

नमूद गुन्हयात आणखी ०६ पाहीजे आरोपी असून त्यांचा शोध घेवून पुढील तपास करण्यात येत असून चोरीस गेलेल्या आणखी मोटार कार हस्तगत करीत आहोत.

**सदर कामगिरीत गुन्हे शाखा,कक्ष-१ चे खालील तपास पथकाने महत्त्वपुर्ण भुमिका पार पाडलेली आहे.**

१) श्री. सुनिल शिंदे वरिष्ठ पोलीस निरीक्षक
२) हर्षल कदम सहा. पोलीस निरीक्षक
३) राजु तडवी सहा. पोलीस निरीक्षक
४) निलेश पाटील सहा. पोलीस निरीक्षक
५)पोलीस हवा./ रोहीदास पाटील
६) पोलीस हवा./ विश्वास पवार
७) पोलीस हवा. /बालाजी चव्हाण
८) पो.ना. निलेश किंद्रे
९) पो.ना. शशिकांत जगदाळे
१०) पो.ना. अजय वाघ
११) मपोना. दिपाली सांवत
१२) पो.ना. दिपक मोरे
१३) पो.ना. रविंद्र सानप
१४) पो.ना. धनाजी भांगरे
१५) पोशि/ आशिष जाधव
१६) पोशि विशाल सावरकर
१७) पोशि.आश्विन ठाकूर
१८) सहा. फौजदार (चालक) प्रदीप लिंगाळे

★★★★★★★★★★

# कार चोरी

## जानेवारी ते ऑक्टोंबर २०२१

| अ.क्र | परिमंडळ | दाखल | उघड | अ—उघड |
|---|---|---|---|---|
| १ | नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत | ६२ | २७ | ३५ |

## सन २०२०

| अ.क्र | परिमंडळ | दाखल | उघड | अ—उघड |
|---|---|---|---|---|
| १ | नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत | ७५ | २१ | ५४ |